# मराठी भाषेची सात्त्विकता स्पष्ट करणारे ज्ञान व सूक्ष्म-चित्रे

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे मुद्दे '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


| | |
|---|---|
| –मनोगत | ७ |
| –ग्रंथाविषयी सूक्ष्म–जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य | ८ |
| –'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ | १० |
| –संकलक आणि ज्ञान–प्राप्तकर्त्या साधकांचा परिचय | १० इ |
| १. मराठी भाषा | ११ |
| १ अ. मराठी भाषेची उत्पत्ती | ११ |
| २. मराठी भाषेचे महत्त्व | १२ |
| * मराठी भाषेतील उच्चार व रूप (लिपी) यांची स्पंदने एकसारखी असल्यामुळेच तिच्यात चैतन्य असणे | १२ |
| * ईश्वरप्राप्तीकडे वाटचाल | १३ |
| ३. मराठी भाषेची वैशिष्ट्ये | १५ |
| * काही शब्द | १५ |
| * अध्यात्मशास्त्रानुसार 'हे' या शब्दाचा परमार्थ | १५ |
| * छायाछत्र | १७ |
| * संचारातील 'सं' या शब्दापासून बनलेले इतर काही शब्द | १८ |
| * 'ग्रहण' शब्दाचे व ग्रहणाचे सूक्ष्म–ज्ञानविषयक परीक्षण | २३ |
| ४. मराठी व इतर भाषा | २५ |
| * भारतीय सोडून इतर भाषा तमप्रधान का ? | २५ |
| * मराठी व इंग्रजी | २७ |
| * इंग्रजी आणि मराठी अक्षरांचे व शब्दांचे सूक्ष्मातील प्रयोग | २८ |
| * 'हॅलो' व 'नमस्कार' या शब्दांचा उच्चार करणे | ३८ |

* ‘झीरो’ व ‘शून्य’ या शब्दांचा उच्चार करणे ४२
* ‘प्रे’ व ‘प्रार्थना’ या शब्दांचा उच्चार करणे ४४
* मराठी व संस्कृत या भाषांची वैशिष्ट्ये ५२
* मराठी ही संस्कृतोद्‌भव भाषा असणे ५२
* संस्कृतची बिजे असलेल्या मराठीची वैशिष्ट्ये ५२
* स्थळवाचक व काळवाचक शब्द, संस्कृत व मराठी भाषांचे वैशिष्ट्य आणि भरतवर्ष म्हणजे रामराज्य येण्याचा काळ ५३
* मराठी ही संस्कृत सोडून इतर सर्व भाषांत सात्त्विक भाषा असणे ५५
* सूक्ष्मातील प्रयोगांत वारंवार सिद्ध झालेले मराठी व संस्कृत भाषांतील चैतन्य ५६
* ‘मराठी’ हा शब्द उच्चारतांनाचे सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्र ५७
* ‘आई’ या शब्दाशी संबंधित सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे ५८
* ‘पती’ या शब्दाशी संबंधित सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे ६०
* संस्कृत, हिंदी व मराठी भाषांची वैशिष्ट्ये ६६
* संस्कृतचा हिंदी व मराठी भाषांवर होणारा परिणाम ६६
* हिंदी, मराठी व संस्कृत भाषांचे कार्य ६६
* रूप व उच्चार सारखेच असल्याने संस्कृत, मराठी व हिंदी या भाषांत सात्त्विकता असणे ६७
५. आसुरी शक्ती व मराठी भाषा ७०
* साधिकेतील मांत्रिकाला वाटणारा मराठी भाषेचा तिरस्कार ७०
६. सात्त्विक मराठी भाषा टिकवण्याचे उपाय ७३
६ अ. सात्त्विक असलेल्या मातृभाषेचा अवमान म्हणजे स्वतःच्या आईचा अवमान असणे ७३
६ आ. पत्रे लिहिण्यासाठी वापरावयाच्या शाईचा रंग ७३
६ इ. मांत्रिकांना विरोध करणारी सनातनची (परात्पर गुरु प.पू. डॉक्टर यांनी साकारलेली) मराठी भाषेची चळवळ ७४

# मनोगत

सध्याच्या घडीला मराठी भाषेची झालेली दुरवस्था पहाता मायबोली म्हणून ती टिकली पाहिजे हे खरेच आहे; पण त्याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे, मराठी भाषा हा हिंदूंना मिळालेला सात्त्विकतेचा अनमोल वारसा आहे, त्यामुळे तो टिकवणे आवश्यक आहे. सात्त्विकता म्हणजे काय ? प्रत्येक गोष्ट ही सत्त्व, रज व तम या तीन गुणांनी (स्पंदनांनी) बनलेली असते. सत्त्व स्पंदनांमुळे मनाला चांगले व शांत वाटते, तर रज व तम स्पंदनांमुळे त्रासदायक वाटते. इंग्रजी भाषेतील लेखन व उच्चार यांतून रज-तम गुण व काळी शक्ती प्रक्षेपित होते. याउलट मराठीत जास्त चैतन्य व सात्त्विकता असल्याने त्यातून चांगली शक्ती प्रक्षेपित होते. एखादी गोष्ट वैज्ञानिक प्रयोगाद्वारे सिद्ध झाली, तर आपला त्या गोष्टीवर लगेच विश्वास बसतो. इंग्रजीतील तामसिकता आणि मराठीतील सात्त्विकताही प्रयोगांद्वारे सिद्ध करता येते. ग्रंथात दिलेल्या याविषयीच्या सूक्ष्मातील प्रयोगांवरून हे ल क्षात येईल. याच्या जोडीलाच मराठी आणि इंग्रजी भाषांतील लेखन आणि उच्चार यांचा सूक्ष्मातून होणारा परिणाम दर्शवणारी 'सूक्ष्म-चित्रे'ही या ग्रंथात समाविष्ट केली आहेत. यामुळे मराठी भाषेचे महत्त्व लक्षात येऊन तिच्याप्रती ममत्व वाढायला आणि तिच्या रक्षणाचे कार्य करायला मराठीप्रेमींना बळ प्राप्त होईल.

संस्कृतनंतर सर्व भाषांत सर्वाधिक सात्त्विक असणाऱ्या मराठी भाषेच्या अंगभूत सात्त्विकतेचा लाभ जर आपणाला हवा असेल, तर तो स्वतःच्या आचरणातून घ्यावा लागेल. यासाठी जीवनातील सर्वच क्षेत्रांत मायबोली मराठीचा वापर १०० टक्के करायला हवा. यासाठीच सनातनने 'भाषाशुद्धीची चळवळ' आरंभिली आहे. या चळवळीला दिशा देणारे मराठी भाषेसंबंधीचे अन्य ग्रंथही सनातनने निर्मिले आहेत. त्यांची विज्ञापने (जाहिराती) या ग्रंथात दिली आहेत. हे ग्रंथ आपण अभ्यासा व इतरांनाही भेट द्या.

**कस्तुरी जवळ असूनही ती ज्ञात नसणाऱ्या कस्तुरीमृगासारखी आपली अवस्था झाली आहे. मराठी भाषेच्या रूपाने कस्तुरीचा ठेवाच देवाने महाराष्ट्राला दिला आहे. या मराठीरूपी कस्तुरीचा सुगंध सर्वांनी भरपूर घ्यावा आणि भावी पिढ्यांनाही तो द्यावा, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना ! - संकलक**